# विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण - अर्थशास्त्र विभाग

जळगाव : मू. जे.महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागातर्फे वर्षभरातील विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. विद्यापीठातून सुवर्णपदक विजेता सुहास वसावे यालाही याप्रसंगी गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उदय कुलकर्णी होते. यावेळी कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. एस.एन.तायडे, वाणिज्य शाखेचे समन्वयिका डॉ.कल्पना नंदनवार, विभागप्रमुख डॉ.महेश बडवे, डॉ.शोभा नेमाडे,डॉ.एन.एस.बोरसे, प्रा.डी.आर.वसावे उपस्थित होते. डॉ.बडवे यांनी वर्षभरातील उपक्रम आणि स्पर्धांची माहिती प्रास्ताविकात दिली. डॉ.तायडे म्हणाले की, स्पर्धांमधून प्रेरणा घेवून स्वविकासासाठी प्रयत्न करावे.






प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी, विद्यार्थ्यांनी आयुष्यात असेच यशश्वी टप्पे गाठून समाजाच्या आर्थिक व सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावा असे सांगितले. डॉ.ललित तायडे, प्रा.अमोल बावस्कर, प्रा.फकीर कोचूरे यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन शुभांगी सोनवणे हिने तर आभार सायली पालीवाल यांनी मानले.

सत्कारार्थी विद्यार्थ्यांत **निबंध स्पर्धेत** (बीए प्रथम वर्ष)- प्रथम पूनम प्रदीप ठाकरे, द्वितीय प्रजापत सोनू कजोडमल, तृतीय नारसिंग हाना तडवी, (बीए गट) - प्रथम गोपाल इंदल तंवर, द्वितीय भाग्यश्री संदीप पवार, तृतीय उषा प्रेमसिंग पावरा, (पदव्युत्तर एम.ए.गट) - प्रथम शुभांगी संजय सोनवणे, द्वितीय अमर सुनील जोहरे, तृतीय चरणसिंग शांताराम राजपूत, (पदव्युत्तर बीकॉम गट) - प्रथम पवनकुमार विष्णू पाटील, द्वितीय पूजा नांदेडकर, दिपाली बाविस्कर, (पदव्युत्तर एम.कॉम गट) - प्रथम सचिन आहुजा यांचा समावेश आहे.

**भित्तीपत्रक स्पर्धेत** (बीए प्रथम वर्ष) - प्रथम राधिका सोनवणे, द्वितीय रुपाली सोनवणे, (बीए गट) - प्रथम गोपाल तंवर, द्वितीय अशोक पावरा, तृतीय संदीप चव्हाण, (पदव्युत्तर गट) - प्रथम प्रकाश राठोड, द्वितीय मयुरी पाटील, **पीपीटी स्पर्धेत** (बीए प्रथम वर्ष) - प्रथम राधिका सोनवणे, (बीए तृतीय वर्ष) - प्रथम भाग्यश्री देवरे, द्वितीय गोपाल तंवर, (पदव्युत्तर गट) - प्रथम वैभव बोरनारे, द्वितीय तेजस्विनी व अश्विनी नाना बारी, तृतीय शुभांगी संजय सोनवणे यांनाही यावेळी गौरविण्यात आले.